## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत दिनांक १ मे २०२० रोजी शेतीवर आधारित उद्योगाचे प्रकल्प उभारणीसाठी अर्थसहाय्य ( शेतकरी गट/शेतकरी उत्पादक संघ /शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी ) आयोजित सेमिनार ( वेबिनार ) कार्यक्रमा दरम्यान विचारण्यात आलेले प्रश्न व त्यांची उत्तरे

| अ.क्र. | प्रश्न विचारणाऱ्या चे नाव | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| १ | संतोष आखरे | शेतकरी गटांना कोणत्या पद्धतीने शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्यासाठी नोंदणी करता येईल? | याबाबत तांत्रिक मार्गदर्शन मिळण्यासाठी आपले जिल्ह्यातील प्रकल्प संचालक, आत्मा व कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा |
| २ | मनीष थूल, वर्धा | सर,वर्धा जिल्ह्यात आम्हाला FPO बनवायची आहे,जिल्हास्तरावर कुणाशी संपर्क करावा ? | |
| ३ | दत्तात्रय बाळासाहेब भडांगे | आम्हाला शेतकरी उत्पादन कंपनी स्थापन करावयाची आहे तरी योजनेत नसलेल्या गावासाठी कंपनी स्थापन करण्याची प्रक्रिया याबद्दल माहिती आपल्या कडूण माहीती मिळेल अशी आशा करतो. | |
| ४ | पंजाबराव चौरे | बँक लोन साठी सहकार्य करावे बँक लोन न मिळाल्यामुळे प्रकल्प करण्यात खूप मोठ्या अडचणी आहेत. | प्रकल्पांतर्गत जास्तीत जास्त कंपन्या / गटांना लाभ मिळण्यासाठी तसेच कर्ज प्रकरण मंजूर होण्यासाठी प्रकल्पाने स्टेट बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांचे सोबत सामंजस्य करार केलेले आहे.शिवाय रक्कम रु. २० लक्ष च्या आतील प्रस्तावांना कर्ज अनिवार्य नाही.. |
| ५ | आजय पांडव | सर शेतकऱ्यांना व्यवसायासाठी बँका लोन देत नाहीत. | |
| ६ | श्रीकांत आखाडे, वालसावंगी एग्रो प्रोड्यूसर कंपनी ली. वालसावंगी ता. भोकरदन जि. जालना | २०१९-२० अंतर्गत बियाणे लागवड व साहित्य उपअभियान SMSP अंतर्गत बियाणे प्रक्रिया व व साठवण केंद्र (seed processing plant) ला केंद्राकडून मंजूरी आली आहे. परंतू राज्य सरकारने अद्याप मंजूरी दिली नाही. ती केंव्हा देणार. | कृपया बियाणे लागवड व साहित्य उपअभियान SMSP योजनेच्या अधिक सविस्तर माहितीसाठी आपले संबंधित जिल्ह्यातील जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. |
| ७ | राकेश पाटील | राजवड, ता. पारोळा जि. जळगाव या गावात शेतकरी बचत गट नाही आहे, सर कसे करावे? | प्रकल्पांतर्गत लाभ घेण्यासाठी गट हा प्रकल्प गावातील असावा. शेतकरी/ महिला /भुमिहिन गटांच्या नोंदणी बाबत मार्गदर्शन |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | हनुमान काटकर | सर, मला गट नवीन करायचा आहे. | मिळण्यासाठी आपले समूह सहाय्यक, कृषि सहाय्यक, किंवा प्रकल्प संचालक, आत्मा यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. प्रकल्पातील गावाची यादी प्रकल्पाचे संकेतस्थळ mahapocra.gov.in येथे उपलब्ध आहे. |
| ९ | राजेंद्र बढे | माझा खुलताबाद तालुक्यातील गल्ले बोरगाव येथे प्रगतिशील शेतकरी मंडळ म्हणून शेतकरी गट आहे परंतु या गटाला अद्याप शासनाच्या कुठल्याही योजनेचा लाभ झालेला नाही. पोकरा प्रकल्पाअंतर्गत अवजारे बँक घेता येईल का ? | १. प्रकल्पासाठी निवड झालेल्या गावातील कोणत्याही यंत्रणेकडे (उदा. आत्मा, माविम, MSRLM, इ.) नोंदणी झालेले शेतकरी/ महिला /भुमिहिन व्यक्तींचे इच्छुक गट अर्ज करण्यास पात्र आहेत.<br>२. सविस्तर माहितीसाठी आपल्याशी संबंधित समूह सहाय्यक, कृषि सहाय्यक, कृषि व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| १० | श्रीकांत आखाडे, वालसावंगी एग्रो प्रोड्यूसर कंपनी ली. वालसावंगी ता. भोकरदन जि. जालना | अवजार बँक चे प्रपोजल SBI बैंक मध्ये गेल्या ७ महिन्यापासुन पेंडिंग ,बैंक काहीच रिस्पॉन्स देत नाहीये. | १. प्रकल्पांतर्गत या घटकाचा लाभ घेण्यासाठी बँकेकडे परिपूर्ण प्रस्ताव सादर करून कर्ज प्रकरण मंजूर करण्या बाबतची जबाबदारी लाभार्थी गटाची आहे<br>२. प्रकल्पांतर्गत जास्तीत जास्त कंपन्या / गटांना लाभ मिळण्यासाठी तसेच कर्ज प्रकरण मंजूर होण्यासाठी प्रकल्पाने स्टेट बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांचे सोबत सामंजस्य करार केलेले आहे. |
| ११ | विजय सुपडू किरोटे | औजार खरेदी करता राज्यात खरेदी करा अशी अट न करता देशात कुठेही खरेदी करता यावे अशी उपाय योजना करावी | औजारे खरेदी करण्यासाठी अशी अट नाही. |
| १२ | स्वप्नील पाटील, भूमिका शेतकरी गट, बेटावद, ता.जामनेर, जि.जळगाव | प्रकल्पांतर्गत भूमिका शेतकरी गट, बेटावद, या गटाचे गोडाऊन चे बांधकाम सुरु आहे पण लॉकडाऊन मुळे काम बंद आहे, परंतु पूर्वसंमती पत्रामध्ये नमूद कालमर्यादेत प्रकल्पाची उभारणी करणे शक्य नाही तरी आमचे जेंव्हा काम पूर्ण होईल त्यानंतर अनुदान स्वरूपी अर्थसहाय्य मिळण्यासाठी काही अडचणी येतील का ? कारण सदर प्रकल्प उभारणीसाठी आम्ही बँक ऑफ महाराष्ट्र यांचे कडून रु.८३००००० लक्ष एवढे मोठे कर्ज घेतलेले आहे कृपया मार्गदर्शन करावे. | प्रकल्पांतर्गत या घटकाचा लाभ देण्यास पात्र व्यावसायिक प्रस्तावांना विविध टप्प्यांवर (प्रकल्पस्तर, जिल्हास्तर व उपविभागस्तर) पूर्वसंमती देण्यात आलेल्या आहेत. सदर पूर्वसंमती पत्रातील नमूद कालमर्यादेत काम पूर्ण न झाल्यास आपण कालावधी वाढवण्यासाठी योग्य कारणे देऊन अर्ज करू शकतात. सक्षम अधिकारी त्याची खात्री करून पूर्वसंमती मधील नमूद कालमर्यादा वाढवून देतील. |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | सुभाषराव ताकमोघे | सर आमची गैबुबा महाराज पाणी उपसा जलसिंचन सहकारी संस्था म.भराडखेडा ता.जाफ्राबाद जि. जालना येथे उपनिबंधक कार्यालय ता जाफ्राबाद अंतर्गत नोंदणी असुन आम्हाला शेती सिंचनासाठी पाणी ची पाईपलाईल करने साठी सरकार मदत करेल का,संस्थेत २१२ सभासद आहेत. | प्रकल्पांतर्गत सहकारी संस्था लाभासाठी पात्र नाहीत. वैयक्तिक घटकांतर्गत पंप संच / पाईप लाईन या बाबीसाठी गटाच्या सदस्यांनी स्वतंत्र अर्ज करून जलसिंचन या बाबीचा लाभ घेऊ शकतात. |
| १४ | सुमित गावंडे | मी ५ वर्षा पूर्वी शेतकरी गट गठीत केलेले आहे परंतु अद्याप पर्यंत कोणताही फायदा झालेला नाही. | प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांतील शेतकरी गटांना प्रकल्पात लाभ घेता येतो. यासाठी गटाने परिपूर्ण प्रस्ताव तयार करून सादर केल्यास छाननी अंती प्रस्तावाला पूर्वसंमती देण्यात येते. तरी सविस्तर माहितीसाठी संबंधित समूह सहाय्यक, कृषि सहाय्यक, कृषि व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| १५ | बालाजी तेलकोटे | ग्रामीण भागात शेतकरी गट मोठ्या प्रमाणावर गठीत करण्यात आले आहेत परंतु अद्याप पर्यंत त्यांना कोणताही फायदा झालेला नाही. | |
| १६ | सागर मानकर | कृषी माल एक्सपोर्ट बद्दल काही उपक्रम सांगा. | कृषी माल एक्सपोर्ट करण्याबाबत आवश्यकतेनुसार प्रशिक्षण आयोजित करता येते. अधिक माहितीसाठी कृपया कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| १७ | विजय सुधाकर पाटील | सर सन २०१७/१८ अंतर्गत आमची गट शेती मध्ये आमच्या कंपनीची निवड झाली असुन आम्हाला आतापर्यंत फक्त ५ टक्केच अनुदान मिळालेले असुन त्यामुळे आमचा प्रकल्प आज रोजी बंद आहे तसेच बँक ही कुठल्याच प्रकारचे सहकार्य करायला तयार नाही तरी यावर काही निर्णय घ्यावा हि विनंती. | आपल्या गटास कृषी विभागाच्या गट शेती योजनेंतर्गत लाभ देण्यात आल्याचे प्रथमदर्शनी लक्षात येते, याबाबत आपण जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. |
| १८ | विजय रामनाथ घानघाव | औजार बॅक मार्फत गावामध्ये किती गटाला लाभ घेता येतो. कारण आमच्या गावामध्ये पाच गट आहे. | प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांतील शेतकरी गटांना या घटकाचा लाभ घेता येतो. क्षेत्रीय स्तरावर सक्षम अधिकारी हे प्रकल्प अहवाल आणि वस्तुस्थिती तपासून पूर्वसंमती देण्याबाबत निर्णय घेतील. |
| १९ | जयदेव रांजणकर | शेतकरी गट, प्रकल्प सुरु झाल्या पासून प्रकल्प पासून खूप आशावादी आहे, मात्र वास्तव असे दिसून येते कि गटाला किंवा समितीला पण पूर्ण पणे माहिती आहे असे दिसत सोबतच | प्रकल्प लोकाभिमुख व अधिक गतिमान करण्यासाठी प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या प्रत्येक ग्राम पंचायती मध्ये ग्राम कृषी संजीवनी समितीची (VCRMC) स्थापना करण्यात आलेली आहे. प्रकल्पाची ग्राम स्तरावर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अंमलबजावणी यंत्रणा पण कोठे तरी नाही, fpo, fpc activity बाबत confuse आहे, सुरवातीला vcrmc सक्षम करणे गरजेचे आहे, आणि ग्राउंड लेवल पर्यंत यंत्रणा पोहचणे अपेक्षित आहे. तरच अपेक्षित साध्य होईल. | प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी सर्व VCRMC सदस्यांना वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात आलेले असून प्रकल्प माहिती पुस्तिका सुद्धा देण्यात आलेली आहे. तसेच ग्राम पंचायत स्तरावर दर्शनीय भागात प्रकल्पातील सर्व बाबींची माहिती बाबतचा फलक लावण्यात आलेला आहे. गावातील शेतकऱ्यांच्या प्रकल्पा संबंधित काही तक्रारी किंवा सूचना असल्यास तक्रार पेट्या लावण्यात आलेल्या आहेत. ग्राम कृषी संजीवनी समितीला प्रकल्प अंमलबजावणी साठी आवश्यक अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे. |
| २० | अमित नाफडे, जय सरदार FPO, बुलडाणा | बँकांकडून कर्ज मंजुरती साठी होणारा विलंब लक्षात घेता , एखादी स्वयंसेवी संस्था शेतकरी उत्पादक कंपनी ला कर्ज देण्यास तयार असल्यास प्रकल्पाचा लाभ मिळू शकेल का? | रु. २० लक्ष च्या आतील प्रस्तावांना बँकेकडून कर्जाची अट अनिवार्य नाही. रु. २० लक्ष वरील प्रस्तावांना अनुदान मिळण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कडे नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थेने व्यवसाय आराखड्यास मुदत कर्ज (Term loan) मंजूर करणे आवश्यक आहे. |
| २१ | संतोष आखरे | सर आमच्या मंडळाची नोंदणी नाबार्ड कडे व आत्मा कडे आहे मंडळ सक्षम करण्यासाठी नाबार्डची काही भुमीका आहे का? | गट सक्षम करण्यासाठी नाबार्डच्या स्वतंत्र योजना आहेत कृपया संबंधित कार्यालयांशी संपर्क साधावा. |
| २२ | दिनेश फोके | नविन गट करण्यासाठी किती सदस्य संख्या आवश्यक आहे. व कोणाशी संपर्क करावा. | नवीन गट स्थापन करण्यासाठी आपल्याशी संबंधित समूह सहाय्यक, कृषि सहाय्यक, कृषि व्यवसाय विशेषज्ञ, प्रकल्प संचालक आत्मा यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा |
| २३ | नानासाहेब देशमुख, जळगाव | रजनीताई देशमुख कंपनीने कर्ज उचल केले आहे ,त्यांच्या व्याजाच्या संबधात प्रश्न विचारायचे आहे. | प्रश्नाचे स्वरूप पूर्ण नाही. कृपया आपण आपल्या जिल्ह्याच्या कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| २४ | अमित नाफडे, जय सरदार FPO, बुलडाणा | सध्या या १५ जिल्ह्यांमध्ये विविध योजनेमधून तयार झालेले शेतकरी गट किंवा कंपनी चे इन्फ्रास्ट्रक्चर चे मापिंग करून त्याचा योग्य वापर करण्यासाठीचे नियोजन प्रकल्पामधून केल्यास थोडेफार दुरुस्ती किंवा बदल करून हे इन्फ्रास्ट्रक्चर उपयोगात येईल व कमी खर्चात जास्त फायदा प्रकल्पाकडून होवू शकेल. | आपल्या सूचनांचे स्वागत आहे. या घटकाच्या अंमलबजावणी मध्ये आपल्या सूचनांचा विचार करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | अतुल खडसे, ता.केळापूर, जि. यवतमाळ | सर आमची यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर तालूक्यातील आदिवासी लोकांनी एकतरी करून कंपनी तयार केली आंम्ही pocra प्रकल्प मध्ये यांत्रिक बँक या योजने करिता प्रस्ताव सादर करून ६ महिने झाले परंतु sdao पांढरकवडा हे आम्हाला पूर्व संमती देत नाही आहे त्यांना वारंवार पत्र देऊन सुद्धा ते आम्हाला त्रुटी च पण पत्र देत नाही आम्ही काय करावे आपण मार्गदर्शन करावे. | उपविभागीय कृषी अधिकारी यांनी कळविल्यानुसार आपला प्रस्ताव अद्याप त्यांचे कार्यालयास प्राप्त नाही. |
| २६ | आशिष नाफडे | शेतकरी उत्पादक कंपनी किंवा गट चे माध्यमातून खत किंवा बियाणे उपलब्धता होणार या बाबत अधिक माहिती व मार्गदर्शक सूचना मिळाव्यात. | याबाबतच्या अधिक माहितीसाठी कृपया आपण जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. |
| २७ | बालाजी टाळीकोटे, देवणी जि.लातूर | मा.मंत्रीमहोदय,शेतकरी वर्ग pocra योजने विषयी सकारात्मक द्दष्टिकोन ठेवून कार्यशिल परंतु या योजनेतून ऑनलाईन मागणी केलेले निविष्ठा या वेळेवर उपलब्ध होत नाही त्यामुळे शेतकरी व क्रषि विभाग यामध्ये नियोजन करून ही आसे प्रश्न निर्माण होत आहेत त्यावर लक्ष घालने गरजेचे आहे. | प्रकल्पांतर्गत निविष्ठा पुरवठा करण्यात येत नाही. परंतु, प्रकल्पाची कार्यवाही गतिमान करण्यासाठी वरिष्ठ स्तरावरून सक्त सूचना देऊन पाठपुरावा करण्यात येईल. |
| २८ | अमित नाफडे, जय सरदार FPO, बुलडाणा | इन्फ्रास्ट्रक्चर साठी प्रकल्प भर देत असताना मार्केटिंग साठी सुद्धा प्रकल्पामार्फत प्रयत्न होणे आवश्यक आहेत. यामध्ये स्मार्ट , MCDC टाइ अप इत्यादी. | आपल्या सूचनांचा पुढील नियोजनामध्ये किंवा अंमलबजावणीमध्ये सकारात्मक विचार करण्यात येईल. |
| २९ | अमित नाफडे, जय सरदार FPO, बुलडाणा | शेतकरी उत्पादक कंपनी यांना प्रायव्हेट मार्केट लायसन्स साठी अटी शिथिल करण्याबाबत प्रकल्प स्तरावरून प्रयत्न झाल्यास चांगले होईल .E-naam ने शेतकरी उत्पादक कंपनी ची नोंदणी केले आहे . काही राज्यांनी APMC च्या क्षेत्राबाहेर होणा-या व्यवहाराला सेस मुक्त केले आहे. महाराष्ट्राने सुद्धा फळ व | सदर बाब संचालक, पणन यांचेशी संबधित असून सदरची बाब वरिष्ठ स्तरावरून त्यांचे निदर्शनास आणण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | भाजीपाला नियमन मुक्त केला आहे. धान्य , डाळ यांचा सुद्धा यामध्ये समावेश करणे आवश्यक आहे | |
| ३० | कपिल बेंद्रे (UNDP) | What is government thinking on-<br>१) in terms of building skills workforce locally specifically concentrating on backward and forward linkages.<br>२) Managing and operating scientific procurement centre's in production areas? UNDP has field experience in MH in agri value chain strengthening and would like to partner with Agri dept, POCRA, SMART. | १. The State and Central Government have conducted and continue to take up need based appropriate training programmes for all the stakeholders, including the field functionaries<br>२. The project would welcome specific proposals for strengthening agriculture value chains |
| ३१ | कपिल बेंद्रे (UNDP) | Farmer institutions strengthening especially on business management side is need of hour. १st/२nd generation of farmers could play important role if capacitated in a certificate courses on farm and FPOs business management. They could help in defining vision and mission; building FPOs business plans and more importantly the governance mechanism and building credit history for availing credit. Market led climate inclusive agriculture is very critical for success. Farmers/ institutions through local community cadre needs to be trained on how to sort, grade and aggregate quality produce with scientific tools through a series of procurement centres in the cluster of villages; how to arrive on pricing, market intelligence, how to storage, how to ship, how to manage logistics, etc Farmers | The State and Central Government have conducted and continue to take up need based appropriate training programmes for all the stakeholders, including the members of the farmer groups and companies. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | needs to paid at the spot at the procurement centre or through digital payment within same day. | |
| ३२ | कृष्णा दगडू धनवाई | या प्रकल्पांतर्गत आम्हाला गोदाम तयार करायचा आहे त्या बद्दल मार्गदर्शन करावे धान्य साठवणुकीसाठी फायदा होईल. | यासाठी परिपूर्ण प्रस्ताव तयार करून सादर केल्यास छाननी अंती प्रस्तावाला पूर्वसंमती देण्यात येते. तरी सविस्तर माहितीसाठी संबंधित समूह सहाय्यक, कृषि सहाय्यक, कृषि व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| ३३ | मारुती डेमे | सर माझा प्रश्न आहे की जिल्हा स्तरावर शेतकरी कंपनी साठी प्रशासकीय स्तरावर संपर्क तयार करण्यात यावा ज्यात आमच्या प्रत्येक अडचणीचे निवारण करण्यासाठी प्रयत्न करता येतील,तसेच शेतकरी अन प्रशासन यातील दुवा म्हणून आम्हाला पण सहभागी करण्यात यावे जसे की नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना तसेच इतर शासकीय योजना यात आम्हाला सहभागी करून घेण्यात यावी यावर प्रयत्न झाले तर नक्कीच शेतकरी उत्पादक कंपनी शेतकऱ्यांना उपयोगी होईल. | जिल्हा स्तरावर कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. आपल्या अडचणीसाठी आपण कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| ३४ | निकेश विनायराव भिसे, जिल्हा अकोला | साहेब आमचा शेतकरी संकल्प स्व सहा बचत गट आहे अकोला जिल्हा मध्ये आत्मा योजने अंतर्गत १ नं चे राजिस्टशन असून आम्हाला गटासाठी २८ एच पी छोटा ट्रॅक्टर घ्यावयाचा आहे परंतु पोकरात टार्गेट नाही म्हणाले. | अवजारे बँक स्थापन करण्यासाठी प्रकल्प अहवाल तयार करून कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. याबाबत त्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. |
| ३५ | पंकज | सर POCRA हा प्रकल्प राबविताना कागदपत्रे गोळा करतांना खूप अडचणी आणि टाइम जात असतो त्यामुळे FPO मधील संचालक स्वतःचे काम सोडून पूर्ण वेळ या कामासाठी देऊ शकत नाही. आणि प्रत्येकाच स्वतःच अस्तित्व असल्यामुळे ते स्वतःचे काम आधी करत असतो. आणि उत्पादक कंपनीमध्ये शेतकरी आहे आणि त्याला प्रकल्प तयार करणे, शेड बांधकामासाठी इंजिनिअर | प्रकल्प अहवाल तयार करताना अगोदर परिपूर्ण माहिती घ्यावी.सर्व आवश्यक कागदपत्र अर्जदार गटांनीच जमा करणे अभिप्रेत आहे.त्याबाबत कृषी व्यवसाय विशेषज्ञ मार्गदर्शन करतील . |

| | | | |
|---|---|---|---|
| | | शोधून एस्टीमेट, ब्लु प्रिंट काढणे, बँक लोणची तयारी करणे त्यासाठी वेगळे कागदपत्रे तयार करणे यात खूप अडचणी जातात त्यामुळे तो अर्धवट हे काम टाकून देत असतो. त्यामुळे यासाठी व्यवस्थापक नेमणुकीकरिता वेगळं मानधन या प्रकल्पांतर्गत मिळविणे दिले तर खूप सोपे जाईल आणि व्यवस्थापक हा educated असल्यामुळे तो ते काम सहज करू शकेल. | |
| ३६ | पंकज | सर प्रकल्प राबविताना पूर्ण खर्च आधी कंपनीला करावा लागतो तर ते या उत्पादक कंपन्यांना जमणार नाही आहे कारण जस जसे काम होत जाईल तशे प्रकल्पातील हिस्सा कंपनीमध्ये जमा केला तर समोरील कामे करणे सोपे होत जाईल. | या घटकांतर्गत कंपनी / गटाला मिळणारे अर्थसहाय्य हे back ended स्वरुपात म्हणजेच काम झाल्यानंतर देण्याचे प्रकल्पाचे धोरण आहे. तूर्त याबाबत विचार करता येणार नाही. |
| ३७ | रामदास, वैष्णवी देवी माहिला शेतकरी गट रा . अवल कोडा ता . उदगीर जि लातुर | गटासाठी ट्रॅक्टर घेण्याचे आहे मार्गदर्शन करा व अर्थसहाय्य काय माहीती देणे व ईतर माहिती देणे . | अवजारे बँकेचा प्रस्ताव तयार करून आपणास ट्रॅक्टर व इतर अवजारांचा लाभ घेता येईल. अधिक माहितीसाठी कृपया कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| ३८ | राजू मुळे, शिवप्रभु फार्मर्स प्रोड्युसर कंपनी बुलडाणा | फार्मर्स प्रोड्युसर कंपनीला शेतकऱ्यांना शेत बांधा वर खते, बियाणे व शेतीउपयोगी औषधी देण्यासाठी शेतकरी कंपन्या ना योग्य दरात देऊन त्यांना शेतकऱ्याच्या बाधांपर्यंत पोहचण्याची मदत करण्यासाठी काही योग्य निर्णय घेता येईल का ते पाहावं | याबाबत अधिक माहितीसाठी कृपया जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. |
| ३९ | सचिन होले | शेतकरी,गट व कंपनी यांना मिळणारी योजना -अनुदान देते वेळी शासनाच्या किंवा कार्यालयच्या प्रक्रियेत सुधारना करणे गरजे आहे ? | याबाबत आपण आपल्या सविस्तर सूचना प्रकल्पाच्या mahapocra@gmail.com या मेल वरती पाठवाव्यात. त्याचा सकारात्मक विचार करण्यात येईल . |
| ४० | संजय मोरे पाटील | अग्रोव्हिजन गटशेती संघाच्या माध्यमातून स्वबळावर एका शाश्वत दिशादर्शक प्रायोगिक प्रकल्पाअंतर्गत लागवड,व्यवस्थापन,प्रक्रिया ब्रँड, विक्री बाबत चार वर्षांपासून | अभिनंदन! याबाबतची सविस्तर माहिती प्रकल्पाच्या mahapocra@gmail.com या मेल वरती कळवावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | काम चालू आहे. दरवर्षी ११ जुलै या एकाच दिवशी किमान शंभर एक्कर क्षेत्रावर घनलागवड द्वारे सीताफळाची लागवड केली जाते. सामान्य शेतकऱ्यांना नाममात्र किंमतीत दर्जेदार रोपे पुरवून अत्यल्प पाण्यावर ती झाडे जगवून,शेतकऱ्यांना स्वतः विक्री व्यवस्थेसाठी मदत करत एक्करी किमान एक लाख रुपये कसे मिळतील यासाठी प्रयत्न आहेत. प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेस चर्चासत्राचे आयोजन केले जाते. गटशेती संघाचे राज्यातील पहिले कार्यालय औरंगाबाद येथे सुरू केलेले आहे. | |
| ४१ | संजीव बनकर | माझी नोंदणीकृत FPC आहे सध्या NAFED मार्फत चणा (Gram) खरेदी सुरु असून खरेदी केलेल्या मालासाठी साठवणूक करण्यासाठी गोडाऊन ची आवश्यकता आहे तरी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यसाठी मार्गदर्शन मिळावे | याबाबत आपण आपले जिल्ह्याच्या कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| ४२ | संकेत कल्याणकर | सर आम्हाला आमच्या कंपनी मार्फत कोरफड एक्सट्रैक्शन चालू करायचे आहे आणि ते प्रोडक्ट आयुर्वेदिक कंपनी ला विकायचे तर आपण या संदर्भात काही मदत करु शकता का. | याबाबत आपण आपले जिल्ह्याच्या कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| ४३ | संतोष उगले | माझ्या गावामध्ये दालमिल चालू करायचा आहे तिच्याबद्दल मला काही माहिती मिळेल का व कोणत्या योजनेमध्ये म्हणायचे मध्ये सबसिडी मिळेल परंतु बँक कर्ज देत नाही म्हणून तपास करत नाही. | याबाबत आपण आपले जिल्ह्याच्या कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| ४४ | संतोष वाघमारे<br>प्रतिष्ठान रेशीम उत्पादक कंपनी केकत जळगाव ता पैठण जी औरंगाबाद | शेतकरी उत्पादक कंपनीच्या माध्यमातून रेशीम उद्योग मध्ये काम चालू आहे १८५ शेतकरी सभासद roc कडे नोंदविण्यात आले आहेत त्या मध्ये आम्हाला एक प्रकल्प करायचा आहे ( चॉकी सेंटर ) व त्याची प्रोजेक्ट कॉस्ट ही जवळपास २० ते २५ लाख इतकी आहे पण pocra चा जर लाभ घेयचा असेल तर त्या FPC च्या | सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. यावर सकारात्मक विचार करणे बाबत त्याना सूचना देण्यात येतील. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | खात्यात तेवढी रक्कम असावी हे बंधन कारक आहे ती अट थोडी अवघड आहे आमचे असे म्हणणे आहे की आम्हाला आमच्या प्रोजेक्ट जसा जसा टप्प्याने काम होईल तसे तसे त्या प्रोजेक्ट चा जो अनुदान निधी आहे तो वेळो वेळी पाहणी करून तो त्या पद्धतीत टप्या टप्याने लाभ द्यावा व एकदम खात्यावर रक्कम असावी ही अट शिथिल करावी अशी आमची विनंती आहे. | |
| ४५ | श्रीकांत विष्णुजी | आम्ही आत्मा अंतर्गत शेतकरी गट करून एकात्मिक शेती करतो, आम्हांला ट्रॅक्टरची आवश्यकता आहे ट्रॅक्टर (मिनी)ला सबसिडी किती आहे. | लहान ट्रॅक्टर साठी रु. १ लक्ष तर मोठ्या ट्रॅक्टर साठी रु. १.२५ लक्ष अनुदान देय आहे. अधिक माहितीसाठी आपण उपविभागीय कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. |
| ४६ | सुभाष टेकाडे | आम्ही वेगवेगळ्या गावातील लोकांनी गट स्थापन केला आहे, या गटाला पोकरामध्ये समाविष्ट केल्या जाईल का? | पोक्रा अंतर्गत गावातील शेतकऱ्यांच्या गटाचाच प्रकल्पांतर्गत लाभासाठी विचार केला जातो. |
| ४७ | सुयोग पाटील | दुग्ध व्यवसाय किंवा शेळी-पालन गटात करता येईल का ? आमचा २० लोकांचा गट आहे आणि त्यासाठी काय प्रक्रीया आहे ? | दुग्ध व्यवसायासाठी जनावरे घेण्यासाठी प्रकल्पांतर्गत अर्थसहाय्य देय नाही. परंतु, दुग्ध प्रक्रिया उद्योगासाठी प्रकल्प अहवाल तयार केल्यास त्याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल. शेळीपालन हा व्यवसाय करता येईल त्यासाठी प्रकल्प अहवाल तयार करून कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| ४८ | अनिल पाटील | पण आत्ता कोरोना चालू आहे आम्ही निंबू लागवड साठी अर्ज केला असून आता कसे पूर्वसंमती पत्र देणार आहेत? | स्थळ पाहणी करून त्या अहवालाच्या आधारे तालुका कृषी अधिकारी यांची मान्यता मिळताच ऑनलाईन पूर्वसंमती मिळाल्याचा संदेश नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावरती देण्यात येईल. |
| ४९ | अरुण मुरुख | दहा महिन्या पासून विविध घटकासाठी पोकरा योजना मध्ये अर्ज केले आहेत सर्व पेंडिंग आहे. कृपया कारण सांगा. | समूह सहाय्यक व कृषी सहाय्यक यांचेशी संपर्क साधावा व अर्जाच्या सध्यस्थितीमध्ये काही त्रुटी असल्यास त्या दूर करण्यास प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना सहकार्य करावे. परिपूर्ण अर्जांवर त्वरित कार्यवाही करणेबाबत तालुका कृषी अधिकारी/उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात आलेले आहेत. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५० | जगदीश पाटील | पोक्रामध्ये आम्हाला पूर्वसंमती मिळाली आहे. फुलशेतीवर काय परिणाम होईल. आम्ही जरबेरा लागवडीच्या तयारीत होतो. | संबधित घटकाच्या अनुकूलतेसंदर्भात उपविभागीय कृषी अधिकारी किंवा कृषि सहाय्यक यांच्याशी संपर्क साधावा. |
| ५१ | राहुल पाटील निकम | माझ्या मिळालेल्या सर्व पूर्व संमती रद्द झाली आहे परत मिळेल का? | सदर घटकांसाठी तुम्ही नव्याने ऑनलाईन अर्ज करू शकता. |
| ५२ | संदीप शिंदे | नानाजी देशमुख संजीवनी योजनेअंतर्गत शेडनेट उभारणीसाठी पूर्वसंमती मिळाल्यानंतर काम सुरू झाले त्यानंतर लगेचच लॉकडाऊन झाल्यामुळे आमचे सर्व काम थांबले आहे. हे काम पुण्याच्या कंपनीला दिलेले आहे परंतु, पुणे रेड झोनमध्ये येत असल्यामुळे तिथून कुठलेही प्रॉडक्ट चाळीसगाव येथे पोहोचत नाही त्यामुळे आमचे काम थांबले आहे तरीसुद्धा त्यासाठी काय करावे लागेल याबद्दल मार्गदर्शन मिळावे. | काम पूर्ण करून घेण्यासाठी आपणास मुदतवाढ देण्यात येईल. |
| ५३ | एकनाथ सिंह चौहान | मला कुकूट पालन २००० पक्षी कराचा आहे नानाजी देशमुख प्रकल्प अंतर्गत कुकूट पालनसाठी ५०००० रकम पुरेशी नाही याच्यावर अनुदान बँक अर्थ मदत करुन मदत करावी. | मार्गदर्शक सूचना सुधारित करताना वरिष्ठ स्तरावरील समितीपुढे आपली सूचना ठेवण्यात येईल. |
| ५४ | अजित देशमुख | या प्रकल्पा अंतर्गत शेतकऱ्यांना जिप्सम उपलब्ध करून मिळेल का आणि मिळाल्यास भाव काय असेल? | स्थानिक शेतकरी उत्पादक कंपनी याबाबत पुढाकार घेऊन जिप्सम उपलब्ध करून देऊ शकते. जिप्सम साठी प्रकल्पांतर्गत अनुदान देय नाही. अधिक माहितीसाठी उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयास संपर्क साधावा. |
| ५५ | महादेव गंगावणे | फळबागेबाबत माहीती दयावी. | फळबाग बाबतच्या मार्गदर्शक सूचना प्रकल्पाच्या https://mahapocra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. |
| ५६ | सुधाकर | गंगापूर ता. लातूर येथील सिताफळ उत्पादक व प्रक्रिया शेतकरी बचत गट गंगापूरच्या वतीने १३ शेतकऱ्यांनी सिताफळ लागवड केली आहे गेल्या आठ महिन्यापासुन आम्हास खड्डे, रोप लागवड | आवश्यक कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात येतील. कृपया आपण त्यांच्याशी संपर्क साधावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | किंवा ठिबक असे कोणतेही अनुदान अध्याप मिळाले नाही आम्ही खूप अडचणीत आहोत. | |
| ५७ | विशाल देशमुख | मी मोहा ता.परळी वै जि बीड येथिल रहिवाशी आहे नानाजी देशमुख कृषी संजीवनी समिती योजने मार्फत शेळी पालन व ठिबक व तुषार हे घटकांची संपुर्ण प्रक्रिया पूर्ण होऊन ४ महिने होऊन सुद्धा  लाभार्थ्यांना आणखी लाभ नाही मिळाला यामुळे योजनेसंदर्भात अविश्वास निर्माण होत आहे. | आवश्यक कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात येतील. कृपया आपण त्यांच्याशी संपर्क साधावा. |
| ५८ | मोहन सिंह राजपूत | बुलढाणा जिल्हातील  जळगांव जामोद तालुक्यातील सुनगांव हे गांव पोखरा मध्ये असुन सुध्दा आतापर्यत एकही शेतकरीला लाभ मिळाला नसुन आणि तालुक्यामधुन सुनगांव येथील शेतकऱ्यांनी विविध योजनेसाठी ऑनलाईन अर्ज केले असून व ग्राम पातळीवर त्यांना मंजूरी मिळाली असून सुद्धा आज पर्यत लाभ मिळाला नसून तरी आपण या समस्या दूर कराव्यात ही विनंती गावकऱ्यांच्या वतीने करतो.  कुषी मित्र- मोहनसिंह राजपूत सूनगाव ता. जळगांव जामोद. जिल्हा बुलढाणा | आतापर्यंत सुनगांव गावाच्या ४ पात्र लाभार्थ्यांना अनुदान अदायगी झालेली आहे. उर्वरित अर्जाबाबत पुढील कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात येतील. कृपया आपण त्यांच्याशी संपर्क साधावा. |
| ५९ | अतुल उनवणे | शेळीपालन चा अर्ज ऑनलाइन भरणे सध्या का बंद केला पुन्हा चालु होईल का ? | प्रकल्पांतर्गत निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये आवश्यक अनुषंगिक बदल करणे शासन स्तरावर विचाराधीन असल्याने त्याबाबत निर्णय झाल्यानंतर आपणास ऑनलाईन अर्ज करता येईल. |
| ६० | सचिन नेपालराव लाडके | मी  शेतात फळबाग लागवड १२-७-२०१९ ला केली त्या मधे लिंबू ९०० झाडे आहे,मोसंबी ५० झाडे, पेरू ५०झाडे, आबा ५०झाडे, सिताफळ ५०, झाडे  लागवड केली त्या मध्ये  ठिबक पन केले तरी सुद्धा अजुनही अनुदान भेटले नाही  माझी शेती मु.पो. भिडी, ता. देवली, जि.वर्धा | आवश्यक अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात येतील. कृपया आपण त्यांच्याशी संपर्क साधावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६१ | जयदेव राजनकर | वैयक्तिक लाभाचे घटक या बाबतीत मार्गदर्शक सूचनेत सुरवातीला लक्षांक नव्हता, मात्र त्यावेळेस काही ग्रामपंचायत मध्ये शेळीपालन, या बाबींना मोठया प्रमाणात पूर्वसंमती देऊन खरेदी झाली, अनुदान पण मिळाले, मात्र ज्या समितीत अजूनही एकही वैयक्तिक लाभार्थी पूर्वसंमती मिळूनही खरेदी झालेली नाही, आता परत त्यांना ड्रॉ ला सामोरे जावे लागेल काय? म्हणजे अश्या लाभार्थी वर अन्याय झाला असे वाटत नाही काय? | गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी मार्गदर्शक सूचनांमध्ये बदल प्रस्तावित आहेत. |
| ६२ | योगेश भुकेले | राज्यामध्ये रेशीम उद्योगासाठी प्रमाणित प्रशिक्षणाची व्यवस्था नाही यामुळे योजनाचा लाभ घेण्यासाठी अडचणी येतात तरी कृषि विद्यापीठ मार्फत तत्काळ व्यवस्था करता येईल का? | सूचना चांगली आहे, प्रशिक्षणाच्या व्यवस्थेसाठी योग्य निर्णय घेऊन कार्यवाही करण्यात येईल. |
| ६३ | मनोज पाटील | डाळिंब लागवड बद्दल माहिती सांगा? | डाळिंब लागवड बाबतच्या मार्गदर्शक सूचना प्रकल्पाच्या https://mahapocra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. |
| ६४ | कपिल पाटील | प्रकल्पांतर्गत विहीर घटकासाठी अनुदान किती आहे? | प्रकल्पांतर्गत विहीर या घटकासाठी रु. २५००००/- अनुदान देय आहे. |
| ६५ | विठ्ठल महाले | विहिरीला अद्याप का मंजुरी मिळालेली नाही? | कृपया परिपूर्ण माहितीसह उपविभागीय कृषी अधिकारी त्यांच्याशी संपर्क साधावा. आवश्यक कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात येतील. |
| ६६ | सचिन,<br>गाव- बालाजीनगर (धावंडा), तालुका - मानोरा जिल्हा - वाशीम | मी एक अल्प भू धारक शेतकरी असून pocra अंतर्गत विहिरी साठी अर्ज केलेला आहे. अर्ज करून आज रोजी जवळजवळ आठ महिने उलटले असून अजूनही अर्ज प्रलंबित आहे. कृपया अर्ज मार्गी लावण्यासाठी आपण काय उपाय योजना करत आहात? | |
| ६७ | नवनीत पाटील, दत्तकृप शेतकरी गट, तालखेड | प्रकल्पा साठी मंजुरी मिळताना खेडे गावात जवळपास नाते संबंध असतातच तर नाते संबंध न पाहता रेशन कार्ड नुसार कुटुंब वेगळे धरून प्रकल्पांना मंजुरी मिळावी | खाजगी जमिनीवरील सामुहिक शेततळे हा घटक प्रकल्पामध्ये तूर्त स्थगित करण्यात आलेला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | समुहीक शेततळे साठी जमीन जवळ असावी तर ते नाते संबंध येतीलच त्यामुळे प्रस्तावास नामंजुरी मिळाली आहे. | |
| ६८ | दीपक भोरे | सामुदायिक शेततळे हा घटक चालू होणार आहे का? | |
| ६९ | कडूबाई बाबूराव सावंत, बाबरगाव गंगापूर, औरंगाबाद | सामुदायिक शेततळे केलं आहे ३४x३४ मीटरचे तीन महिने झाले असून मला पैसे मिळाले नाही तर ते कधी भेटतील? | आवश्यक कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात येतील. कृपया आपण त्यांच्याशी संपर्क साधावा. |
| ७० | बाळू शेळके | पाईप लाईन व इतर काही घटक बंद आहेत त्या कधी चालु होणार आहेत? | पाईप लाईन हा घटक बंद केलेला नाही. मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करणेबाबत उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात येतील. कृपया आपण उपविभागीय कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. |
| ७१ | हनुमंत मालवटकर | पाईप लाईन  पंप हे घटक बंद आहेत त्या कधी चालु होणार आहेत? | |
| ७२ | किरणकुमार पाटील, चिखली जि. बुलडाणा | PVC पाईप ची उपलब्धता POCRA अंतर्गत पुन्हा सुरू होणार आहे काय? | |
| ७३ | सचिन अगरवाल | ३१ जानेवारी २०२० ला माझ्या इलेक्ट्रिक मोटर पंप व्हेरिफिकेशन झालेला आहे परंतु अनूदान अजून सुद्धा मिळालेलं नाही. | आवश्यक अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात येतील. कृपया आपण त्यांच्याशी संपर्क साधावा. |
| ७४ | सुरेश साळवे, वांगी बु. ता.सिल्लोड जि. औरंगाबाद | वांगी बु.येथील शेतकऱ्यांनी पाईप व मोटार चे बिल अपलोड केलेले आहे परंतू बिल पुढे पाठविले तर त्याच्यावर error येत आहे अंस कृषी साहेब सांगतात आणी बिल पुन्हा वापस येत आहे. | तांत्रिक बाब तपासण्यात येईल. आवश्यक अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात येतील. कृपया आपण त्यांच्याशी संपर्क साधावा. |
| ७५ | कृष्णा सावंत | सोलर पंप योजना शेतकऱ्यांना  पोकरा योजनेतून द्यावी व त्यासाठी शेतकऱ्यांना अनुदान द्यावे. | सदरची बाब प्रकल्पाच्या तांत्रिक समितीसमोर ठेवण्यात येईल व समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| ७६ | राशीद पठाण, गाव — सुगाव | ठिबक, तुषार संच, शेततळे, पाईप लाईन यासाठी अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना एक वर्षापासून लाभ प्राप्त झालेला नाही. | आवश्यक अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात येतील. कृपया परिपूर्ण माहितीसह आपण त्यांच्याशी संपर्क साधावा. |
| ७७ | सोपान काळे, हिंगोली बसमत,चिखली | ठिबक, तुषार संच चे अनुदान प्राप्त झालेले नाही. | |

| | | | |
|---|---|---|---|
| ७८ | रवींद्र लांजुरकर, गाव- आळसणा, तालुका- शेगांव, बुलढाणा | फेब्रुवारी पासून ठिंबक आणि तुषार साठी पुर्वपरवानगी मागितली आहे.मला आजपर्यत परवानगी दिली नाही.माझा ऊस लागवड आहे .मि बराच पाठपुरावा केला परंतु उपयोग नाही. | |
| ७९ | गणेश पालवे, जि. बुलढाणा | ठिबक साठी पूर्वसंमती प्राप्त झालेली नाही कधी मिळेल? | |
| ८० | नितीन वेहाळे | ठिबक साठी अनुदान प्राप्त नाही. | |
| ८१ | वडेवाले शिवहार, गाव- पेठशिवणी, तालुका- पालम परभणी | माझ्या गावातील विहीर, पाईपलाईन या घटकाच्या एकाही अर्जाला अनुदान मिळाले नाही. | |
| ८२ | समाधान वाघ | सामूहिक शेततळे,पीव्हीसी पाईप व इलेक्टरीक मोटर या बाबींचा अर्ज सद्या करता येत नाही त्या पूर्ववत कधी चालू होतील. | खाजगी जमिनीवरील सामुहिक शेततळे हा घटक प्रकल्पामध्ये तूर्त स्थगित करण्यात आलेला आहे |
| ८३ | विशाल देशमुख, गाव- मोहा ता.परळी वै जि बीड | योजने मार्फत शेळी पालन, ठिबक व तुषार या घटकांची संपुर्ण प्रक्रिया पूर्ण होऊन ४ महिने होऊन सुद्धा लाभार्त्यांना आणखी लाभ नाही मिळाला या मुळे योजने संदर्भात अविश्वास निर्माण होत आहे. | आवश्यक अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात येतील. कृपया आपण त्यांच्याशी संपर्क साधावा. |
| ८४ | सुरेश साळवे, ग्राकृसंस सदस्य वांगी बु. | वांगी बु. येथील बऱ्याच शेतकऱ्यांचे दोन ते तिन महिन्यापासुन ठिबक व पाईपचे अनुदान आलेले नाही. | |
| ८५ | सतीश शिंदे, सईबाई माहिला बचत गट, नागेश्वरवाडी, ता. उमरखेड | समूहातील महिला व्यवसाय करू इच्छित आहेत पण उद्योगांचे प्रशिक्षण तालुक्याच्या ठिकाणी व्हावेत अशी आमची इच्छा आहे. | पुरेसे प्रशिक्षणार्थी उपलब्ध झाल्यास प्रशिक्षण तालुक्याच्या ठिकाणी आयोजित करता येईल. याबाबत आपण आपल्या जिल्ह्याचे कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| ८६ | उमेश अरबट, सावळी ता. संग्रामपुर जि.बुलढाणा | पोकरा अतर्गत MSRLM मधील स्वयमसहायता समुहांना प्रशिक्षण दिल्यास प्रकल्पाची अमंलबजावणी आणखी चागल्याप्रकारे होवू शकेल तर याबाबत मार्गदर्शन मिळावे. | सूचना चांगली आहे, याबाबत वरिष्ठ स्तरावर निर्णय घेऊन कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांना सूचना देण्यात येतील. |
| ८७ | भरत आहेर | सर NHM हया योजनेतून शेडनेट पॉलिहाऊस करणाऱ्या शेतकरयांना ट्रेनिंग घेऊनच मिळत असे परंतु आजच्या | सूचना चांगली आहे, याबाबत वरिष्ठ स्तरावर निर्णय घेऊन कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांना सूचना देण्यात येतील. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | परिस्तिथीत वर भाजीपल्याविषयी मार्गदर्शन करा कारण लागवडीविषयी दुविधा मानस्तीती आहे. | |
| ८८ | शुभांगी चर्डे | MSRLM अंतर्गत ग्राम संघांना व SHG ला मत्स्यव्यवसाय बीज प्रक्रिया, औजार बँक, बेकरी, दलमील, ऑइल मिल, गोडाऊन विषयी मार्गदर्शन करावे. | कृपया याबाबत आपण आपल्या जिल्ह्याचे कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| ८९ | गोपाळ काजळे | SHG group यांनी निवडलेल्या उद्योग, यांची ट्रेनिंग चि सुविधा आपण PoCRA मध्ये देण्याची सुविधा करण्यात येऊ शकते का? कारण उद्योग निवडल्या नंतर त्याविषयी सखोल माहिती माहीत नसते. | कृपया याबाबत आपण आपल्या जिल्ह्याचे कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| ९० | राधाकृष्ण भालेकर | प्रशिक्षण संस्था तालुका स्तरावर होणे आवश्यक आहे. | पुरेशे प्रशिक्षणार्थी उपलब्ध झाल्यास प्रशिक्षण तालुक्याच्या ठिकाणी आयोजित करता येईल. याबाबत आपण आपल्या जिल्ह्याचे कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| ९१ | धीरज सुरवसे | शेतकरी महिलांना विविध व्यवसायासाठी ट्रेनिंग देण्यात यावे पोखरा अंतर्गत महिला व्यवसाय करण्यासाठी खूप इच्छुक असतात पण त्यांना व्यवसाय ट्रेनिंग व्यवसाय निवड करणे यासंदर्भात ट्रेनिंग देणे महत्वाचे आहे. | कृपया याबाबत आपण आपल्या जिल्ह्याचे कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| ९२ | अजय झडे | गट शेती चे माध्यमातून विविध योजनांची अंमलबजावणी व युद्ध स्तरावर काम करणे, शेतकरी प्रशिक्षण व प्रात्यक्षिकांचे व्यवस्थापन करण्यात यावे. | कृपया याबाबत आपण आपल्या जिल्ह्याचे कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. आवश्यक अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात येतील. कृपया आपण त्यांच्याशी संपर्क साधावा. |
| ९३ | अमित महात्मे | मी Trally करीता बरेच दिवसांपूर्वी online केलेले आहे परंतु अद्यापही माझा अर्ज pending दाखवत आहे. | आवश्यक अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात येतील. कृपया आपण त्यांच्याशी संपर्क साधावा. |
| ९४ | भरत मते | नमस्कार सर, मी भरत मते रा. वादिकाल्या, त.अंबड, जी. जालना , आमच्या गावच नाव पोखरा या योजने मध्ये २ महिन्या | विविध घटकांसाठी ८५५ अर्ज प्राप्त झाले असून ग्राम कृषी संजीवनी समितीची मंजुरी बाकी आहे.पुढील कार्यवाही साठी उपविभागीय कृषी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पूर्वीच नाव आहे आहे पण आजूक शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे लाभ भेटलेला नाही... मंत्री मोहादय मला या विषयी माहिती द्या. | अधिकारी यांना सूचना देण्यात येत आहेत. याबाबत आपणही जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. |
| ९५ | देवेंद्र खडसे | मी एक भूमिहीन मजु र आहे. मागील वर्षी शेळीपालन साठी ऑनलाईन अर्ज केला होता आता पर्यंत लाभ मिळाला नाही. काय करावे लागेल? | आवश्यक अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात येतील. कृपया आपण त्यांच्याशी संपर्क साधावा. |
| ९६ | जय सरदार शे.उ.कं. | मागील सहा महिन्यात प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये किंवा अंमलबजावणी पद्धती मध्ये काही बदल झाले असतील तर त्याबाबत माहिती द्यावी. | काही मार्गदर्शक सूचना सुधारित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. ते होताच प्रकल्पाच्या संकेतस्थळावर हि माहिती उपलब्ध होईल. |
| ९७ | महादेव गंगावणे | ट्रॅक्टर घेण्यासाठी काय करावे लागेल? | सविस्तर माहिती प्रकल्पाच्या https://mahapocra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. |
| ९८ | रावसाहेब मोरे | पॉवर टिलर साठी अनुदान देनार का? | प्रकल्पांतर्गत “हवामान अनुकूल कृषी यांत्रिकीकरण” या घटकातून पॉवर टिलर (८ एचपी पेक्षा कमी, ८ एच पी व त्यापेक्षा जास्त) यासाठी अनुदान देय आहे. यासाठी आपले संबधित गावातील समूह सहाय्यक यांचेशी संपर्क साधावा. तसेच याबाबतची सविस्तर मार्गदर्शक सूचना प्रकल्पाच्या www.mahapocra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. |
| ९९ | सतीशकुमार आनंद तायडे | मी वाशीम जिल्ह्यातील शेतकरी आहे. पोकरा योजना ही अतिशय चांगली आहे परंतु सर यामध्ये आपल्या काळात कृषी यांत्रीकीकरण समावेश केला. पण सर आम्हाला ट्रॅक्टर घ्यायचा आहे आम्ही कृषी विभागात संपर्क केला तेव्हा कृषी यांत्रीकीकरण साठी अजून निधी ची तरतूद झाली नाही तर लवकर या तरतूद करावी. | निधी उपलब्ध झालेनंतर प्रकल्पातील सर्व जिल्ह्यांना त्वरित निधी आवंटीत करण्यात येईल. तदनंतर आपले अर्जास प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| १०० | गणेश काळे | पोखरा योजनेतुन हार्वेस्टर साठी अर्ज केलेला होता पण यांत्रिकीकरण योजनेचा निधिच खोलण्यात आलेला नाही, तसेच औरंगाबाद जिल्हा मधील शेतकऱ्यांनी या योजनेत हिररीने सहभाग घेतला परंतु निधि जास्त खर्च झाल्याचे सांगुन औरंगाबाद चा निधि थांबवण्यात आला यावर आपले मत काय? | निधी उपलब्ध झालेनंतर प्रकल्पातील सर्व जिल्ह्यांना त्वरित निधी आवंटीत करण्यात येईल. तदनंतर आपले अर्जास प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| १०१ | कल्याण पाटील | साहेब भोकरदन तालुक्यातील पदमावती गावात ऐकाही शेतकऱ्यांना लाभ मिळाले नाही तरी लक्ष केंद्रित करून शेतकरी मंडळी ना त्याचा लाभ देण्यात यावा. | आपल्या गावातील पात्र १२ लाभार्थ्यांना अनुदान अदायगी झालेली आहे. उर्वरित अर्जांवर त्वरित कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत. अधिक माहितीसाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. |
| १०२ | भास्कर चव्हाण | sir, namaste, mi Bhaskar chavan, Jategaon, georai, di.beed.. we have already completed various works under Pokhara scheme, but subsidy not received till,today, pl.when it will receive, and pl. give early,because we are invested amount, and kharip season begins soon, we need financial asset.for pre kharip various wor | निधी प्राप्त होताच कार्यवाही पूर्ण झालेल्या प्रस्तावांचे अनुदान शेतकऱ्यांच्या आधार शी संलग्न बँक खात्यावर जमा करण्यात येईल. |
| १०३ | परमेश्वर राजबिंडे | माननीय मंत्री महोदय पोकरा या योजने मध्ये ठिबक सिंचन अनुदान ८० % पाईपलाईन अनुदान, शेततळे अनुदान, विहीर अनुदान व इतर अनुदान हे ५ हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांनाही द्यावा ही विनंती. | प्रकल्पांतर्गत ५ हे. पर्यंत जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांनाच लाभ देण्याचे धोरण आहे. ५ हे. पेक्षा जास्त जमीनधारणा असलेल्या शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या नियमित योजनांमधून लाभ देण्यात येतो. |
| १०४ | सचिन आगरवाल | सर महाराष्ट्र दिवसाच्या आपल्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा सर ३१ जानेवारी २०२० ला माझ्या इलेक्ट्रिक मोटर पंप व्हेरिफिकेशन झालेला आहे परंतु अनूदान अजून सुद्धा मिळालेलं नाही | अनुषंगिक कार्यवाही पूर्ण करून निधी प्राप्त होताच देय अनुदान आपल्या आधार लिंक बँक खात्यावर जमा करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| १०५ | सचिन जंगले | सर मी सचिन जंगले. रा भदैगाव ता घनसावंगि जिहा जालना. सर मि पोकरा अंतर्गत अज डिसेंबर महिन्यात केला असून त्या वरति अजून कूठलिच कारवाई झाली नाही. व कृषी विभागाच्या प्रतिनिधींशी संवाद साधला असता ते म्हणाले योजना बंद झाली आहे. | अनुषंगिक कार्यवाही पूर्ण करून निधी प्राप्त होताच देय अनुदान आपल्या आधार लिंक बँक खात्यावर जमा करण्यात येईल. |
| १०६ | संतोष उगले | माझ्या गावामध्ये २०० ऑनलाईन अर्ज लाभार्थ्याने भरले परंतु शासकीय कर्मचाऱ्यांनी त्याचा पाठपुरावा केला नाही व त्यांना मार्गदर्शन सुद्धा केला नाही त्याच्यापासून लाभार्थी वंचित राहिले अशा कर्मचाऱ्यावर आपण कारवाई करणार का संतोष विठ्ठल उगले उपसरपंच काजळांबा ता.जि.वाशिम | संबधित कर्मचाऱ्यांना सक्त सूचना देऊन पाठपुरावा करण्यात येईल. तरीही अपेक्षित प्रगती न झाल्यास कारवाई बाबत सुचना देण्यात येतील. |
| १०७ | शिवा काळे | जालना जिल्ह्यामध्ये sdo च्या हलगर्जीपणामुळे रेशीम उत्पादक शेतकर्यांना pocra मधून १ वर्ष होऊन सुद्धा अनुदान मिळाले नाही. | आपल्या सूचनेची दाखल घेतली असून उपविभागीय कृषी अधिकारी यांना सक्त सूचना देण्यात येत आहेत. |
| १०८ | शाम येवले<br>चिन्मय श्याम येवले<br>शेलूवाडा (शेलू बु) ता. कारंजा जि. वाशिम | जानेवारी फेब्रूवारी २०२०मधील अर्जाची स्थीती काय आहे ? व योजनेचा लाभ कधी मीळेल? मी विहीरीसाठी अर्ज केलेला आहे. पावसाळा जवळ येत आहे. Pocra अंतर्गत अर्ज केलेला आहे त्याचबरोबर फळबाग योजनेसाठी याचा लाभ कधी मिळेल? | आपले सर्व अर्ज ग्राम कृषी संजीवनी समिती स्तरावर प्रलंबित आहेत याबाबत उपविभागीय कृषी अधिकारी यांना सूचना देण्यात येत असून कृपया आपण त्यांचेशी संपर्क साधावा. |
| १०९ | राम इंगळे | या मध्ये गोडाऊन बांधकाम आहे काय? | शेतकरी गट/ शेतकरी उत्पादक कंपनी यांना या बाबीचा लाभ घेता येईल. |
| ११० | आनंद देशमुख | सर आमचा शेतकरी गट हळद उत्पादन घेत आहे हळद वाळविण्यासाठी सोलार ड्रायर युनिट पोक्रा अंतर्गत मिळेल का ? | या प्रकल्पांतर्गत गटांना / कंपन्यांना सोलार ड्रायर युनिट देय आहे यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करावा. सदर प्रस्तावाला तांत्रिक व आर्थिक छाननी अंती पूर्वसंमती देण्यात येईल. अधिक माहितीसाठी कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| १११ | संजय कडुजी सानप<br>पिपंळनेर ता लोणार<br>जि बुलढाणा | पोखरा योजने अंतर्गत भूजल सर्वेक्षण विहीर साठी च्या अटी शिथील करण्यात याव्यात. | विहिरी साठीच्या अटी शिथिल केलेल्या आहेत. कृपया अधिक माहितीसाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| ११२ | गोपाल चोपडे | शेतीला कंपाऊंड आवश्यक आहे योजनेत समाविष्ट करण्यात यावी | प्रकल्पाच्या मंजूर बाबींमध्ये तूर्त शेतीला कंपाऊंड ही बाब समाविष्ट नाही प्रकल्पासाठीच्या तांत्रिक समितीसमोर ही बाब विचारार्थ सादर करण्यात येईल. |
| ११३ | प्रतिनिधी<br>देवणी ॲग्रो फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, लातूर | नमस्कार साहेब , २०१९-२० गळीत धान्य बिजोत्पादन अंतर्गत देय असलेले बियाणे उत्पादन अनुदान त्या संदर्भातील GR निघून देखील आजतागायत मिळाले नाही. | सदर बाब पोक्रा प्रकल्पाशी संबधित नसली तरी सदर बाब कृषी विभागाच्या संबधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून पाठपुरावा करण्यात येईल. |
| ११४ | सुनील भोईराज | कृपया कृषी ताई आणि कृषी मित्र यांना मिळणारे मानधन वाढ करावी कारण ते स्वतः ची मिळणारी मजुरी सोडून दिवसभर कृषी सहाय्यक व समुह सहाय्यक यांना निस्वार्थी पणे प्रत्येक शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन मदत करतात. | प्रकल्पासाठीच्या तांत्रिक समितीसमोर हि बाब विचारार्थ सादर करण्यात येईल. |
| ११५ | यशराज कोलते<br>ता. गंगापूर,<br>जि. औरंगाबाद | माविम औरंगाबाद अंतर्गत तेजस्विनी लोकसंचलित साधन केंद्र गंगापूर अंतर्गत ५०० बचत गट आहे कृषी सेवा केंद्र पण हे केंद्र चालवत आहे तर आमच्या साधन केंद्र द्वारे खतेबियाणे शेतकरी कुटुंबाना देता येईल का ? | आपण सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल आपले अभिनंदन! पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. |
| ११६ | मंचकराव कराळे | ज्या गावात पोक्रा नाही त्या गावातील गटांसाठी वेगळे उपक्रम आहेत का? | कृषी विभागाच्या वैयक्तिक तसेच गटांसाठीच्या योजनांचा तसेच MSRLM ही संस्था विशेष करून गटांच्या सबलीकरणावर भर देत आहे अधिक माहितीसाठी MASRLM च्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. |
| ११७ | सागर येंबडवार | नमस्कार सर, कोरोना चा पार्श्वभूमीवर शेतकरी फसवणुक होऊ नये बियाणे ,खत या साठीची शासना कडून गाव स्तरावर पुढील रणनिती काय? | याबाबत कृषी विभागामार्फत आवश्यक खबरदारी घेण्यात येत असून तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत. आपणास अडचण आल्यास नियंत्रण कक्षाशी (१८००२३३०२४४ व ९४२२९४ २४३४) संपर्क साधावा. |
| ११८ | नरेंद्र गवळी | खत आणि बियाणे वाटप करण्यासाठी कृषि विभागाने निवडलेल्या गटांनमध्ये MSRLM च्या गटांना सहभागी करणे आवश्यक होते. | आपण सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल आपले अभिनंदन! पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी उपविभागीय कृषी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | त्यामुळे कोवीड १९ या परिस्थितीमध्ये महिलांचा सहभाग वाढला असता आणि त्यांना लाभ मिळाला असता. | |
| ११९ | प्रतिनिधी<br>जागेश्वर शेतकरी उत्पादक कंपनी | जागेश्वर FPC ने Nature's Agri Basket ही मोबाईल अॅप भाजीपाला, फळे, डाळी आणि सर्व धान्य घरपोच लोकांना मिळावे म्हणून तयार करून ती अकोला आणि पुणे येथे कार्यान्वित केली आहे, यास अधिक विकासास मदत होईल का ? | निश्चित मदत होईल. अधिक माहितीसाठी आपण अकोला येथील कृषी व्यवसाय विशेषज्ञ यांचेशी संपर्क साधावा. |
| १२० | संदीप खेडेकर<br>वैजापूर, जि.औरंगाबाद | तुती लागवड वैजापूर मध्ये पोक्रा अंतर्गत जास्त प्रमाणात झाली आहे व त्यांनी गट तयार केले आहेत त्यांच मनोबल वाढण्यासाठी सांगा. | तुती लागवडीवर औरंगाबाद जिल्ह्यामध्ये विशेष लक्ष देण्यात आलेले आहे. ज्या बाबी पूर्ण केलेल्या असतील त्यांचे देय अनुदान त्वरित अदा करणेबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. |
| १२१ | राधु ताउर | सर, महीला बचत गटाच्या मार्फत कृषि सेवा केंद्र चालु करता येईल का? | कृषी सेवा केंद्र चालू करण्याकरिता परवाना जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचे मार्फत दिला जातो. आपण जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचेशी संपर्क साधावा. |
| १२२ | रफिक शेख | सर गटाला कृषी सेवा केद्रं सुरु करता येईल का?<br>सि आर पी आलेश्वर, ता- परांडा, जि- उस्मानाबाद | |
| १२३ | Anonymous | २०२०-२१ साठी ठिबक सिंचन अनुदान किती? | ठिबक सिंचनासाठी २ हे पर्यंत जमीन असलेल्या शेतकऱ्यांना ८० % तर २ हे ते ५ हे पर्यंत जमीन असलेल्या शेतकऱ्यांना ७५% अनुदान देय आहे. |

**टीप :** वर नमूद केल्या प्रमाणे जिल्हानिहाय कृषि व्यवसाय विशेषज्ञ यांची यादी तसेच संपर्क क्रमांक जोडले आहेत तरी शेतकरी गट /शेतकरी उत्पादक कंपन्यां संदर्भात काही प्रश्न किंवा अडचणी असतील तर त्यांना संपर्क करावा.

| प्रकल्प विशेषज्ञ – कृषि व्यवसाय | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | जिल्हा | नाव | भ्रमणध्वनी क्रमांक | ई मेल आय डी |
| १ | औरंगाबाद | शंकर निरडे | ७९७२४६८९९१ | shankarnirde040@gmail.com |
| २ | बिड | स्वप्निल कदम | ९४२३६०२३५२ | skadam776@gmail.com |
| ३ | जालना | विशाल ढेंगळे | ९५९५१९१९९९ | vishaldhengle@gmail.com |
| ४ | जळगाव | चंदन मुळे | ९६०४६३८९४३ | dpiu.jalgaon@gmail.com |
| ५ | लातुर | श्रीराम हेलाले | ८२७५१७९७१७ | atmalatur@gmail.com |
| ६ | उस्मानाबाद | नेताजी चव्हाण | ९७६७८६१३८८ | dpiu.osmanabad@gmail.com |
| ७ | नांदेड | प्रमोद झरे | ९०९६३३८९९९ | pramodzare09@gmail.com |
| ८ | परभणी | दिपक विभूते | ९४२२१७७४५८ | dpiu.parbhani@gmail.com |
| ९ | हिंगोली | रामभाऊ कावरखे | ९६५७७२७७९३ | psab.hingoli@gmail.com |
| १० | अमरावती | आशिष जोशी | ९८५०५९७८९१ | aashish_1978@rediffmail.com<br>dpiu.amravati@gmail.com |
| ११ | बुलढाणा | निलेश केदार | ७३५०६५१६०७ | kedarnilesh14@gmail.com |
| १२ | अकोला | नोगेश ठाकरे | ९४०३११५७८९ | dpiu.akola@gmail.com |
| १३ | वाशिम | ज्ञानेश्वर बुधवंत | ९४०३१४३६१४ | psabwashim@gmail.com |
| १४ | यवतमाळ | ब्रम्हानंद चव्हाण | ८४५९२०२२६१ / ८३०८७०६२२२ | chavhanbramhanand@gmail.com |
| १५ | वर्धा | शेखर सगणे | ९३२६१८३८५२ / ८८९८५०३२७८ | shekharsagne@rediffmail.com |